# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी
क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. २८/२०२५ दिनांक १८/०१/२०२५

## प्रेस नोट.

### अपघाताचा बनाव करुन खुन करणाऱ्या ईसमास अटक - पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १४/०१/२०२५ रोजी २२.१३ च्या सुमारास वसई पुर्व, तुंगारेश्वर येथिल ब्रम्हा पेट्रोल पंप समोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ चे गुजरात - मुंबई सर्विस वाहिनीवर सदर गुन्हयातील मयत प्रभुकुमार लुटन झा, वय ४२ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि. पालघर यास अज्ञात वाहन चालकाने ठोकर मारुन नमुद गुन्हयातील मयत प्रभुकुमार लुटन झा, याचे मृत्युस कारणीभुत झाल्याबाबत फिर्यादी श्री. गगण धरमदेव झा, वय ४३ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि.पालघर यांनी दिलेल्या तक्रारी वरुन गु.र.क्र.१९/२०२५ बी.एन.एस कलम १०६(१),२८१,१२५(ए),१२५(बी) सह मो.वा.कायदा कलम १८४, १८७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकारण पथकातील अधिकारी अंमलदार यांना मयत यास ठोकर मारणाऱ्या वाहनाचा व अज्ञात चालकाचा शोध घेण्याबाबत योग्य त्या सुचना देऊन आदेशित केले होते. सदर त्यानुसार पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास केला असता असे समजले कि, मयत हा इसम नामे सनातन बिनय सिंह यांच्या क्रेनवर चालक म्हणुन काम करत होता. मयत याच्या सोबत सनातन बिनय सिंह याचे भांडण झाले असल्याबाबत गुप्त बातमीदारामार्फतीने माहिती प्राप्त झाली होती त्यावरुन गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी सनातन बिनय सिंह, वय ४९ वर्षे, रा. वसई पुर्व ता. वसई जि. पालघर यास ताब्यात घेऊन तपास केला असता त्याने सदर गुन्हयातील मयत हा दारु पिऊन येऊन त्यास व त्यांच्या ऑफीसचे जवळच असलेल्या ट्रान्सपोर्ट कंपनीचे इतर चालक यांना शिवीगाळ करीत असे. मयत याच्या मुळे त्याचे वेळोवेळी आर्थिक नुकसान झाले होते. त्याचा राग येऊन सनातन बिनय सिंह याने मयत याचे डोक्यात लोखंडी रॉडने मारुन जिवे ठार मारल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन नमुद गुन्हयात आरोपीत सनातन बिनय सिंह, वय ४९ वर्षे,रा. वसई पुर्व ता.वसई जि.पालघर यास अटक करण्यात आली असुन पुढील तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, मा.श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, मा. श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. शकिल शेख, पोलीस निरीक्षक गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/रमेश वाघचौरे, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, मिथुन मोहिते, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, राहुल कर्पे, अभिजित नेवारे, दिलदार शेख, अनिल

साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, वसिम शेख सर्व नेम.पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

